## मॉल मधून ब्रॅन्डेड वस्तू चोरणारे आंतरराज्य गुन्हेगारांना गुन्हे शाखा युनिट ४ ने, केले अटक

इसम नामे सुशांत सुभाष घोरपडे रा. पारिजात सोसायटी ए-३०२ खारेश्वर आंगण किरकटवाडी सिंहगडरोड पुणे यांचे चतुश्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीत पॅव्हेलीयन मॉल सेनापती बापट रोड पुणे येथे असलेल्या शॉप पैकी ईथ्यॉस वॉच शॉपी नावाचे घडयाळ विक्रीचे दुकान आहे. या दुकानात दि.८/०८/२०१९ रोजी दुपारी ३/३० ते ३/४५ वाजताचे दरम्यान दोन अनोळखी इसमांनी येऊन रॅडो घडयाळ खरेदी करण्याचा बहाणा करुन सेल्समनची दिशाभुल करुन रॅडो कंपनीची ४ घडयाळे चोरुन नेली.सदरचा प्रकार झालेबाबत दि.२३/०८/२०१९ रोजी स्टॉक चेक करीत असताना त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी दि.१/०८/२०१९ रोजी ते दि.८/०८/२०१९ या दरम्यानचे कालावधील दुकानातील सी सी टीव्ही फुटेजची पहाणी करता दोन अनोळखी इसमांनी मॉलमध्ये येऊन रॅडो कंपनीची घडयाळे खरेदी करण्याचा बहाणा करुन सेल्समनची दिशाभुल करुन रॅडो कंपनीची ४ घडयाळे त्यांची बाजारातील किंमत रुपये ५,०४,८००/- चोरी करुन घेऊन गेल्याचे २० दिवसांनी फिर्यादीचे निदर्शनास आल्याने त्यांनी त्याबाबत चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केल्याने गु.र.नं. ७४३/२०१९ भा.दं.वि.कलम ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास मा.अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे सो, व पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री. बच्चनसिंह यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-४, चे पोलीस निरीक्षक श्रीअंजूम बागवान व त्यांचे पथक करीत असताना प्राप्त सी सी टी व्ही फुटेजवरुन गुन्हयातील आरोपी हे एका टुरिस्ट टॅक्सीतून घटनास्थळी आल्याचे निष्पन्न झाले. टुरिस्ट टॅक्सीचे नंबर वरुन ती ओला कंपनीची टॅक्सी असल्याने ओला टॅक्सी चालकाची माहिती प्राप्त करुन त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये आरोपी हे मंगळवारपेठ येथे लॉजवर राहिले असल्याचे तेथील रजिस्टर वरुन आरोपींची माहिती घेऊन सदरचे आरोपी हे गुन्हा घडल्याचे दिवशी विमानाने दिल्लीतून पुण्यात आल्याचे निष्पन्न झाले. ओला कॅब माहितीच्या आधारे विमान सेवा पुरविणारी कंपनी व कॅब सुविधा पुरविणारे कंपनीकडून आरोपींची माहिती प्राप्त केली त्यावरुन ते दिल्लीवरुन पुण्याला येऊन लॉजवर मुक्काम करुन परत कॅबव्दारे पुणे शहरात दोन मॉलवर चोरीचा प्रयत्न केला होता. परंतू त्यात यश न आल्याने त्यांनी चतुश्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीतील पॅव्हेलीयन मॉल सेनापती बापट रोड पुणे येथे डाव साधला.

सदर बाबत मा.अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे सो, व पोलीस उप-आयुक्त गुन्हे बच्चनसिंह यांनी पोलीस निरीक्षक अंजूम बागवान यांना सर्व ओला कॅब व विमान सेवा पुरविणारे कंपन्यांची माहिती प्राप्त करुन व आरोपींचा तपशिल प्राप्त करुन मागदर्शन केले. पोलीस निरीक्षक अंजूम बागवान यांनी तपास टिम तयार करुन टिममधील पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार महाडीक, पो.ना. सचिन ढवळे यांना तपासाचे सुचना दिल्या.त्याप्रमाणे आरोपीं बाबतची माहिती काढत असताना पो.ना. सचिन ढवळे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत आरोपी हे दिल्लीचे रहीवाशी असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सदर टिमला दिल्ली येथे रवाना केले. सदर टिमने दिल्लीत ५ दिवस ठाण मांडून वेगवेगळया ठिकाणी रहात असलेले आरोपी यांचेवर पाळत ठेऊन स्थानिक पोलीसांचे मदतीने दिल्लीतील लोधीबाग, लोधी कॉलनी,सेंट्रल गंज येथून आरोपी नामे **१) आशिष कुशल बिस्त वय ३० वर्षे रा. घर नं.१६७ लखपत कॉलनी नवी दिल्ली, २) आकाश बालकिसन ढाका वय २६ वर्षे रा. के-८२ बी.के.दत्त कॉलनी लोधी रोड नवी दिल्ली. ३) रविंदरसिंग अमरजितसिंग वय ३२ वर्षे रा. घर नं.४८० बी.के.दत्त कॉलनी करबाला लोधी कॉलनी नवी दिल्ली** यांना अटक करुन पुणे येथे आणले. अटक आरोपींकडे केलेल्या चौकशीत त्यांनी दिल्ली मुंबई पुणे अशा मोठ मोठया मेट्रो सिटीतील मॉलमध्ये शिरुन खरेदीच्या बहाण्याने चो-या केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच पुण्यात चोरी केल्यानंतर त्यांनी मुंबई लोअर,परेल येथील एक शोरुम मध्ये प्रवेश करुन आरमानी कंपनीचे महागडे टी शर्ट चोरी केले होते. त्यावेळी तेथील सेल्समनचे चाणाक्षपणामुळे ते पकडले जाऊन त्यांना अटक झाली होती. त्यामध्ये १ आरोपी फरारी असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत. आता पर्यंतचे तपासात **आरोपींचे आणखी १० ते १२ साथीदार आरोपी असून ते हॅन्डसम ग्रुप नावाने ओळखले जातात.** आरोपी इसमांना ब्रॅन्डेड वस्तू चोरुन त्या विकणे अथवा स्वतःहा वापरणे या त्यांच्या सवयीमुळे सेल्समनला त्यांचा संशय येत नव्हता.

सदरची कामगिरी ही अपर पोलीस आयुक्त श्री,अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त श्री.बच्चनसिंह, पोलीस निरीक्षक श्रीं.अंजूम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक निलेशकुमार महाडीक, व कर्मचारी सचिन ढवळे, अशोक शेलार, शंकर पाटील, निलेश शिवतरे, राजू मचे, गणेश काळे, शंकर संपते, भालचंद्र बोरकर, सुहास कदम यांनी केली आहे.